<u>प्रतिवादी क्र. ३ तर्फे विधिज्ञ श्री. एस.जी.पणदुकर यांचेमार्फत यांचेमार्फत साक्षीदाराचा उर्वरित उलटतपास शपथेवर सुरु</u> –

दावा मिळकतीचे सध्याचे क्षेत्र ९५ गुंठे इतके आहे. दावा मिळकतीचे पूर्वीचे क्षेत्र अंदाजे ३ हेक्टर इतके होते. त्यापैकी सध्या ९५ गुंठे इतके क्षेत्र शिल्लक आहे. दावा मिळकतीपैकी किती क्षेत्र कोणी कोणास विकले याचा मला तपशील सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र. १ व २ यांना दावा मिळकतीपैकी ५ एकर १० गुंठे इतके क्षेत्र माझे आजोबा महादेव लक्ष्मण राणे यांनी विक्री केलेले आहे. माझे चुलते लक्ष्मण शिवराम राणे यांनी देखील दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र विक्री केलेले आहे. परंतु, त्याचा तपशील मला सांगता येणार नाही. आम्ही दावा मिळकतीपैकी १२ गुंठे क्षेत्र गवस यांना विक्री केलेले आहे. गवस यांचे पूर्ण नाव मला सांगता येणार नाही. ते नेमके केव्हा विक्री केले ते मला सांगता येणार नाही. परंतु, अंदाजे १० वर्षापूर्वी ते क्षेत्र आम्ही गवस यांना विकलेले आहे. माझे चुलते लक्ष्मण शिवराम राणे यांनी दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र तीन ते चार लोकांना विक्री केलेले आहे. माझे चुलते व आम्ही दावा मिळकतीपैकी विकलेल्या क्षेत्राचे व्यवहार हा प्रतिवादी क्र. १ व २ यांना जमीन विक्री झालेनंतर केलेले आहेत. सन १९७५ साली माझे वय अंदाजे १५ वर्षे इतके होते. प्रतिवादी क्र. १ व २ यांना दावा मिळकतीपैकी क्षेत्र विक्री केलेनंतर त्याठिकाणी मोजणी करुन ते क्षेत्र त्यांच्याकडे दिलेले होते. ती मोजणी खाजगी स्वरुपातील होती. मोजणी करणाऱ्या व्यक्तीचे नाव मला माहिती नाही. या मोजणीबाबत कागदपत्रके तयार केलेली होती. ती कागदपत्रके मी हजर करु शकतो का याबाबत मला आता काही सांगता येणार नाही. माझे आजोबा महादेव राणे हे सन १९९१ साली मयत झालेले आहेत. माझे वडील सहदेव हे तीन वर्षापूर्वी मयत झालेले आहेत. मला सदर दाव्याचे कामी वादी म्हणून समाविष्ट केले त्यावेळेस दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र प्रतिवादी क्र. १ व २ यांना विक्री केलेनंतर उर्वरित काही क्षेत्रापैकी काही क्षेत्र हे अन्य इसमांना विक्री झालेची बाब मला माहिती होती. ही माहिती मी माझ्या वकिलांना सांगितलेली होती अगर कसे हे सध्या मला आठवत नाही. आम्ही दावा मिळकती क्षेत्रापैकी काही क्षेत्र विक्री केलेले आहे ही बाब वकिलांना सांगणे मला

आवश्यक वाटले नाही. माझी प्रतिवादीकडून त्यांनी आमच्या २६ गुंठे क्षेत्रात केलेले अतिक्रमण सोडून देणेची न्यायालयाकडे मागणी आहे. मी दाव्यात त्याबाबत दुरुस्ती करुन मागणी केलेली आहे अगर कसे हे मला माहित नाही. गवस याला विक्री केलेल्या क्षेत्राची मोजणी व नकाशा केलेला आहे. मी गवस याला करुन दिलेल्या खरेदीपत्राची प्रत हजर करुन शकतो का हे आता मला सांगता येणार नाही. तालुका निरीक्षक भूमिअभिलेख व जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग ओरोस यांचे कार्यालयामार्फत गवस यास १२ गुंठे क्षेत्र स्वतंत्र करुन दिलेले आहे. त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मला हजर करता येईल की नाही हे मला आता सांगता येणार नाही. गवस हे मुंबई येथे स्थायिक आहेत. गवस यांनी आमचेकडून खरेदी केलेले क्षेत्र अन्य ३ ते ४ इसमांना विक्री केलेले आहे.

**न्यायालयाची वेळ संपल्याने उर्वरित उलटतपास पुढील तारीखेपर्यंत तहकूब.**

सही/-
(दुर्गा प्र.पुजारी)
दि.२०/०१/२०२४. दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),सावंतवाडी.